जिल्हा रुग्णालय, नाशिक आणि विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक सदर रुग्णालये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता वापर करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण - २०१७/प्र.क्र. ३ /आरोग्य-३

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
तारीखः २२ जुलै, २०१९

वाचा -

1) **शासन निर्णय, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नस्ती क्रमांक-एमईडी-१०१६/प्र.क्र.७०/२०१६/शिक्षण -२, यांची दिनांक ३१.०५.२०१९ रोजींची टिप्पणी**
2) **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- राआअ/रुग्णालय हस्तांतरण/नाशिक/२५२३३/२०१९, दिनांक-१८.०६.२०१९**

प्रस्तावना - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे संयुक्त विद्यमाने आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा रुग्णालय व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता सदर रुग्णालये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास वापरावयास देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता. याबाबत पुढील प्रमाणे शासन निर्णय देण्यात येत आहे.

शासन निर्णय-

जिल्हा रुग्णालय, नाशिक आणि विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु केल्यास विशेषज्ञांची उपलब्धता आणि उपचार यामध्ये आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या एकूण प्रवेश क्षमतेमध्ये वाढ होणार आहे. तसेच याचा फायदा नाशिक विभागातील रुग्णांना होणार आहे. सदर बाब विचारत घेता आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा रुग्णालय व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी

या दोन रुग्णालयांतील खाटा, रुग्ण कक्ष, शस्त्रक्रिया विभाग इत्यादी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकरीता वापर करण्यास खालील अटीं व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम हे सार्वजनिक आरोग्यविभागा कडील विभागीय संदर्भ सेवा रूग्णालय व जिल्हा रूग्णालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करावा. यामध्ये सध्याच्या रूग्णालयातील पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची व त्याचे निकषानुसार सक्षमीकरण करण्याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील. सदर रूग्णालयाच्या परिसरात पदव्यूत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी सर्व अधिकच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व आर्थिक जबाबदारी संबंधित अधिष्ठाता यांची राहील. जिल्हा रुग्णालय नाशिकचे नियंत्रण जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडे व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे प्रशासकिय नियंत्रण वैद्यकिय अधिक्षक यांच्याकडे पूर्वी प्रमाणेच राहील. तर शैक्षणिक विभागाचे नियंत्रण संबंधित अधिष्ठाता यांचे राहील.

२. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नेमण्यात आलेले डॉक्टर्स,नर्सेस,तंत्रज्ञ व इतर कर्मचारी वर्ग सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहतील. शैक्षणिक उपक्रमासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकिय व अवैद्यकिय पदांची निर्मिती वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत करण्यात येईल व ते अधिष्ठाता यांच्या प्रशासकिय नियंत्रणाखाली राहतील.

३. भारतीय आर्युविज्ञान परिषदेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या मानकांनुसार आवश्यक प्राध्यापक आणि निवासी / प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स व कर्मचारी यांची नेमणूक वैद्यकिय शिक्षण विभागाने करावी.

४. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मानकांप्रमाणे सदर दोन रूग्णालयास लागणारी आवश्यक यंत्रसामुग्री, औषधे व औषधीसाहित्य इ.पुर्वीप्रमाणेच आरोग्य विभागामार्फत पुरविण्यात येईल. मानकांपेक्षा अधिक लागणारी उपकरणे / औषधे व औषधेसाहित्य वैद्यकिय शिक्षण विभागामार्फत पुरविण्यात यावीत.

५. सदर दोन रुग्णालयासाठी उपकरणे / फर्निचर /इमारत इ.देखभाल तसेच संलग्न आहार, स्वच्छता, सुरक्षा, धुलाई इ. सेवा सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पुरविण्यात येतील.

६. प्रस्तावित पदव्युत्तर वैद्यकिय महाविद्यालयास सदर दोन रुग्णालयातील खाटा MCI चे निकष पूर्ण करण्यासाठी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता वापरण्यास देण्यात याव्यात.

७. सदर रुग्णालयाच्या परिसरात सध्याच्या इमारती व्यतिरिक्त अधिकच्या इमारतीची आवश्यकता शैक्षणिक उपक्रमासाठी भासत असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक व संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन यांनी आवश्यकतेनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये यांची मान्यता घ्यावी.

८. रुग्णालयांच्या दैनंदिन काजकाजासाठी अडचण येऊ नये यासाठी कुलगुरु, आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक किंवा त्यांचे प्रतिनिधी, संचालक वैद्यकिय शिक्षण यांचे प्रतिनिधी आणि उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक, जिल्हा शल्य चिकित्सक नाशिक, वैद्यकिय अधिक्षक संदर्भ सेवा रुग्णालय नाशिक यांची एक समिती स्थापन करण्यात यावी. सदरील समिती रुग्णालयासंबंधी निर्णय घेईल.

९. कुलगुरु आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक यांचमेध्ये तपशिलवार करार करण्यात येईल. या कराराचा मसुदा वैद्यकिय शिक्षण विभागाच्या सहमतीने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत तयार करण्यात येईल. त्यानंतर सामंजस्य करारानंतर जिल्हा शल्य चिकित्सक व नवनियुक्त अधिष्ठाता हे आपापसांत करार करतील.

१०. शैक्षणिक उपक्रमाकरीता आवश्यक अधिकच्या सर्व कंत्राटी सेवा याबाबतची कार्यवाही वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने करावी.

११. शैक्षणिक उपक्रमासाठी जमा होणारे शुल्क, मिळणारा शासकिय निधी याची व्यवस्था अधिष्ठाता यांनी स्वतंत्रपणे करावे.

१२. शैक्षणिक उपक्रमासाठी येणारा सर्व प्रकारचा खर्च, वेतन इ.बाबींसाठी वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने स्वतंत्रपणे आहरण व संवितरण अधिकारी नियुक्त करावा तसेच स्वतंत्र लेखाशीर्ष सुरू करावे.

१३. डीएनबी अभ्यासक्रम सुरु करण्यास वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सहकार्य करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१०३७१७३७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.07.22 16:55:41 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुंटुंब कल्याण), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. मा.मंत्री (वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुंटुंब कल्याण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४. महालेखापाल, लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता,महाराष्ट्र-१ मुंबई,/महाराष्ट्र-२ नागपूर
५. सचिव (वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये), मंत्रालय,मुंबई.
६. आयुक्त, आरोग्य सेवा व संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
८. सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये) मुंबई.
९. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) ,मुंबई
१०.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ कार्यालय.
११.जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक
१२.जिल्हा कोषागार अधिकारी,नाशिक
१३.निवडनस्ती (आरोग्य-३)